# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०८/०५/२०२४ (बुधवार) सकाळ**

---

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध कारवाई

दि. ०७/०५/२०२४ रोजी पोस्टे केळवद येथील स्टाफ पोस्टे परीसरात पेट्रोलिंग करीत असता गुप्त बातमीदार व्दारे माहीती मिळाली कि, पांढुर्णा (म.प्र.) येथुन नागपुरकडे पांढऱ्या रंगाच्या कारमध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. अशी माहीती मिळाल्याने स्टाफ यांनी पांढुर्णा ते नागपुर महामार्गावर सावळी फाटा येथे दि. ०७/०४/२०२४ चे ०४.०० वा. दरम्यान नाकाबंदी केली असता पांढुर्णा कडुन नागपुरच्या दिशेने एका पांढऱ्या रंगाची कार क्र. एम एच–४९/बि आर ९४०६ ही येताना दिसल्याने सदर वाहनास स्टाफच्या मदतीने थांबण्याचा ईशारा केला असता वाहन चालकाने आपली कार रोडच्या कडेला थांबवली असता सदर वाहन चालक यास त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने आपले नाव शेख शोएब शेख छोटेसाब वय २६ वर्ष रा. हसनबाग नागपुर असे सांगीतले व त्याचे सोबत असलेल्या ईसम त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने आपले नाव अभिलाष संतोष नामदेव वय ३१ वर्ष रा. लाभ लक्ष्मी नगर, कळमना, नागपुर असे सांगीतले. त्यांना सदर वाहनामध्ये मागे काय आहे याबाबत विचारपुस केली असता वाहन चालकाने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने वाहनाची तपासणी केली असता वाहनामध्ये मागच्या सिटवर व डिक्कीमध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत सुगंधीत तंगाखु मिळून आला तो खालिलप्रमाणे

| अ.क्र. | सुगंधीत तंबाखु नाव | प्रत्येकी वजन | प्रत्येकी किंमत | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | पिवळया रंगाच्या २० बोऱ्यामध्ये होला हुक्का शिशा तंबाखु चे प्रत्येकी १० पाउच एकुण २०० पाउच | ०१ किलो | ८२०/–रू. | १,६४,०००/–रू. |
| २ | पांढऱ्या रंगाच्या १७ बोऱ्या ईगल सुगंधित तंबाखु चे प्रत्येकी ११ पाउच एकुण १८७ पाउच | ४०० ग्राम | ६४०/–रू. | १,१९,६८०/–रू. |
| ३ | पांढऱ्या रंगाच्या ०३ बोऱ्यामध्ये राजश्री पान मसाला चे प्रत्येकी २५ पाउच एकुण ७५ पाउच | २५० ग्राम | ३४०/–रू. | २५,५००/–रू. |
| ४ | पांढऱ्या रंगाच्या ०१ बोरीमध्ये डबल ब्लॅक १८ चे १०० पाउच | ३० ग्राम | २५/–रू. | २५००/–रू. |

महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत सुगंधित तंबाखु एकुण किंमत ३,११,६८०/–रू. व KIA SELTOS कार क्र. एम एच–४९/बि आर ९४०६ किमती १०,००,०००/–रू. असा एकुण १३,११,६८०/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर जप्त करण्यात आलेला सुगंधीत तंबाखु ची वाहतुक करणाऱ्या आरोपीवर पुढील कार्यवाही करीता मा. अन्न सुरक्षा अधिकारी, नागपुर यांना पत्रव्यवहार करून अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती एस. व्ही. बाभरे या पोलिस स्टेशन केळवद येथे हजर येउन त्यांनी सदर जप्त करण्यात आलेल्या सुगंधीत तंबाखु ची पाहणी करून वर नमुद आरोपीवर गुन्हा नोंद होणेकरीता लेखी फिर्याद दिल्याने नमुद आरोपीवर पोस्टे केळवद येथे गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. अनिल मस्के, उपविभागीय पोलिस अधिकारी सा. सावनेर विभाग यांचे मार्गदर्शनात सपोनि राकेश साखरकर ठाणेदार पोस्टे केळवद, पोहवा सुधिर यादगिरे, नापोशि होमेश्वर खडसे, चालक पोहवा रविंद्र साठोणे व पोहवा दिनेश काकडे यांनी केली असुन पुढील तपास सपोनि राकेश साखरकर ठाणेदार पोस्टे केळवद हे करत आहेत.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर